# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. ११ जानेवारी, २०२०

जळगाव दि.११ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळेतील इंग्रजी विभागाच्या वतीने नोबेल पारितोषिक विजेत्या साहित्यिकांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या ‘साहित्य सृजन’ या भित्तीपत्रिकेचे विमोचन इंग्रजी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. भूपेंद्र केसूर यांच्या हस्ते झाले.

प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. नोबेले पुरस्कार विजेत्यांच्या साहित्यामुळे भाषा समृध्द होत जाते असे सांगुन डॉ.केसुर यांनी व्याकरण, उच्चारण शास्त्र, बोलण्याचा सराव याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कवी वा.ना.आंधळे उपस्थित होते. प्रा.पगारे यांनी साहित्य कृती या वैश्विक, सत्य व सजगतेची जाणिव निर्माण करुन देणाऱ्या असाव्यात त्यामुळे त्या अजरामर ठरतात असे मत व्यक्त केले. या भित्तीपत्रिकेतील ६ नोबेल पारितोषिक विजेत्या साहित्यिकांच्या साहित्याचे वाचन निकीता ठाकुर, नेहा ठाकुर, शुभम वसतकर, प्रांजली जोशी, भाग्यश्री साळी, प्रतिक्षा पाटील यांनी केले. प्रतिभा गलवाडे यांनी सुत्रसंचालन केले. तर डॉ. सुदर्शन भवरे यांनी आभार मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी